MHKO100015612016 **<u>नियमीत दिवाणी दावा क्र. १२७/२०१६</u>**

महादेव शिवगोंडा पाटील.
//वि//
शिवगोंडा मलगोंडा पाटील वगैरे.

**<u>निशाणी क्र.२७ वर आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.३ यांनी त्यांचेविरुध्द झालेला "विना कैफियत" चा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादीतर्फे प्रस्तुत अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हा कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना समन्सची बजावणी झालेली आहे. परंतु, त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८, नियम १ प्रमाणे प्रतिवादींना दाव्याचे समन्सची बजावणी झालेपासून ३० दिवसांच्या आत अथवा न्यायालयाच्या परवानगीने जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत सादर करता येते. परंतु, प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.३ यांना दिनांक १६/०२/२०२३ रोजी समन्सची बजावणी होऊन ते हजर झाले. परंतु, त्यांनी कैफियत दाखल न केल्यामुळे त्यांचेविरुध्द दि.०८/०६/२०२३ रोजी विना कैफियत आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दि.२५/०४/२०२४ रोजी दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जात प्रतिवादी यांनी असे कारण नमुद केलेले आहे की, प्रतिवादी यांना कागदपत्रे वेळेत मिळाली नाहीत व त्यांचे वकीलांना भेटून माहिती देता आली नाही. तसेच, प्रतिवादी क्र.३ हे त्यांचे व्यवसायाचे कामासाठी पुणे येथे असलेने व त्यामुळे त्यांना तेथे थांबावे लागलेने मुदतीत वकीलांशी संपर्क करुन योग्य ती तजवीज करता आली नाही. त्यामुळे, प्रतिवादी यांना वादीचे दावेस कैफियत व म्हणणे मुदतीत सादर करता आले नाही. प्रत्यक्षात सदर कारण व प्रतिवादी हजर झालेपासूनचा १ वर्षापेक्षा जास्तीचा काळ विचारात घेतले असता, सदर कारण संयुक्तीक वाटत नाही. परंतु, प्रकरणाची गुण-दोषावर निर्गती करण्यासाठी प्रतिवादी यांना त्यांचा बचाव मांडणेकामी संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे, प्रतिवादी यांना त्यांची कैफियत सादर करु देणे

मला योग्य वाटते. वर नमुद प्रमाणे प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक २३/०२/२०२३ रोजी न्यायालयात हजर झालेपासून ब-याच विलंबाने म्हणजे दिनांक २५/०४/२०२४ रोजी दाखल केलेला असल्याने प्रस्तुत अर्ज खर्चासह मंजुर करणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: आदेश :-**

०१. अर्ज रक्कम रु.३,०००/- (रुपये तीन हजार फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.३ यांनी पुढील तारखेपर्यंत वादी यांना अदा करावी.

०३. खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी क्र.३ यांना त्यांची कैफियत सादर करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
RATHOD SUJIT
Date: 2024.07.04
17:59:56 +0530

**( एस. ए. राठोड )**

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः ०४/०७/२०२४.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 04/07/2024 |
| Order signed by P.O. on | 04/07/2024 |
| Order uploaded on | 04/07/2024 |